# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र - १९६** **दिनांक :- २६/१०/२०२६**

## " कासोदा पोलीस व एरंडोल महसूल विभागाची अवैध वाळू उत्खनन व वाहतुकी विरुद्ध धडक कारवाई; ०४ वाहने व ७६ ब्रास वाळूसह एकूण ३१,५८,१०७/- रुपयांचा मुद्देमाल जप्त "

**कासोदा पोलीस स्टेशन हद्दीत अवैध गौण खनिज (वाळू) उत्खनन व वाहतुकीविरुद्ध महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाने केलेल्या संयुक्त कारवाईत चार वाहने व १६ वाळूसह एकूण ३१,५८,१०७/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैधरीत्या साठवून ठेवलेला ६० ब्रास वाळूचा ढिगारा जप्त करून एरंडोल तहसील येथे हलविण्यात आला आहे.**

**मा. जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे, मा. पोलीस अधीक्षक जळगाव श्री. श्रीकांत धिवरे**, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक नखाते, मा. उपविभागीय अधिकारी श्री. मनीषकुमार गायकवाड तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विजयकुमार ठाकुरवाड यांच्या संयुक्तीक मार्गदर्शनाखाली अवैध वाळू वाहतुकीविरुद्ध कारवाई करण्यात आली असून उत्राण गावाच्या वेशीजवळ, मारोती मंदिराजवळ तसेच करदन शिवारातील गिरणा नदीपात्र परिसरात वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने आढळून आली.

- **दिनांक २५/१०/२०२६ व दिनांक २६/१०/२०२६ रोजी करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

**१. उत्राण, मारुती मंदिराजवळ :-** दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास टाटा कंपनीचे मॉडेल १५१२ सहा चाकी आयशर वाहन क्रमांक MH-१८ BG-७२०८ आढळून आले. वाहनात अंदाजे **५ ब्रास** वाळू होती. पथकाला पाहून चालक वाहन जागेवर सोडून पळून गेल्याने त्याची ओळख समजू शकली नाही. या कारवाईत **एकूण ६,२३,६२८/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

**२. करदन शिवार, गिरणा नदीपात्र परिसर :-** दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ०१ वाजेच्या सुमारास टाटा कंपनीचा निळ्या रंगाचा डंपर क्रमांक MH-१८ CB-१९२० आढळून आला. वाहनात अंदाजे **८ ब्रास** वाळू होती. या प्रकरणी वाहनमालक निलेश राजेंद्र भदाणे व चालक रामू महादेव शिवाई यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून **एकूण ८,३७,६५६/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

**३. करदन शिवार, गिरणा नदीपात्र परिसर :-** दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ०१:३० वाजेच्या सुमारास चॉकलेटी रंगाचे आयशर वाहन क्रमांक MH-२० GC-९१४७ आढळून आले. वाहनात अंदाजे **२ ब्रास** वाळू होती. या प्रकरणी शाहरुख शब्बीर पठाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून **एकूण ६,०९,४१४/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

**४. करदन शिवार, गिरणा नदीपात्र परिसर :-** दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री २ वाजेच्या सुमारास टाटा कंपनीचा निळसर रंगाचा डंपर क्रमांक MH-४८ AG-१५९३ आढळून आला. वाहनात अंदाजे **१ ब्रास** वाळू होती. या प्रकरणी भूषण शिवाजी सोनवणे, रा. विचूर, ता. जि. धुळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून **एकूण ८,०४,७०७/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

**याशिवाय, अवैधरीत्या साठवून ठेवलेला ६० ब्रास वाळूचा ढिगारा जप्त करून एरंडोल तहसील येथे हलविण्यात आला आहे. सदर प्रकरणांमध्ये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७) व ४८(८) अन्वये कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.**

## -: हस्तगत मुद्देमालाचा एकत्रित तपशील :-

| अ.क्र. | मुद्देमाल | किंमत |
|---|---|---|
| १ | टाटा आयशर वाहन क्र. MH-१८ BG-७२०८ | ६,००,००० |
| २ | टाटा डंपर क्र. MH-१८ CB-१९२० | ८,००,००० |
| ३ | आयशर वाहन क्र. MH-२० GC-९१४७ | ६,००,००० |
| ४ | टाटा डंपर क्र. MH-४८ AG-१५९३ | ८,००,००० |
| **एकूण ४ वाहने व ७६ ब्रास वाळू** | | **३१,५८,१०७** |

**सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक नखाते, चाळीसगाव परिमंडळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कासोदा पोलीस स्टेशनचे प्रभारी श्री. श्रीकांत पाटील यांच्या नेतृत्वात श्री. नितीन सूर्यवंशी, श्री. धर्मेंद्र ठाकुर, श्री. श्रीकांत ब्राम्हणे, श्री. निलेश गायकवाड, श्री. योगेश पाटील तसेच महसूल विभागाकडून मा. तहसीलदार श्री. गोपाळ पाटील, ग्राम महसूल अधिकारी श्री. रवीराज साहेबराव पाटील (उत्राण), श्री. वैभव पाटे (एरंडोल), श्री. संदीप पाटील (गालापूर), श्री. नरेंद्र पाटील (उत्राण) तसेच मंडळ अधिकारी श्री. नदीम शेख (उत्राण) यांचे पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

**SD/-**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**

**प्रति,**

**सर्व संपादक/वार्ताहार**
**प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया**
**२/- जनहितार्थ प्रसारण करीता**

*****************************************************************************